


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक ३०८ • सोमवार दि.७ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## शिंदे-फडणवीस आम्हाला फसवतायत-जरांगे पाटील

### कामे सोडा १२ ला अंतरवालीत या;...तर महाराष्ट्र बंद करु



जालना: राज्य सरकारने मराठा समाजाला दिलेली आश्वासने पाळली नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्याला फसवत आहेत, असा घणाघाती आरोप करीत हातातील सर्व कामे सोडून १२ सप्टेंबर रोजी अंतरवालीत या असे आवाहन मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज केले आहे.

मराठा आरक्षणाच्या मागण्यांवरून अंतरवाली सराटी येथे सुरू असलेल्या आंदोलनाची धग दहाव्या दिवशीही कायम आहे. उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी सोमवारी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल करत, सरकारने दिलेली आश्वासने पाळली नसल्याचा आरोप केला. शिंदे-फडणवीस आम्हाला फसवत आहेत, असा थेट आरोप करत त्यांनी १२ सप्टेंबर रोजी अंतरवाली सराटी येथे होणाऱ्या बैठकीत मुंबईतील आंदोलनाची दिशा ठरवली जाईल असे त्यांनी यावेळी सांगितले. ३ सप्टेंबर रोजी सरकारच्या शिष्टमंडळाने अंतरवाली सराटी येथे जरांगे पाटील यांची भेट घेतली होती. विविध मागण्यांवर सरकारने सकारात्मक भूमिका घेत आश्वासने दिली होती. मात्र, त्यानंतरही मागण्यांची पूर्तता झालेली नसल्याचा दावा जरांगे यांनी केला. त्यामुळे त्यांनी पाणी घेणे तसेच सलाईन घेणे बंद केल्याचे सांगितले.सरकारच्या भूमिकेवर संताप व्यक्त करताना जरांगे म्हणाले, सरकार जाणूनबुजून हलगर्जीपणा करत आहे. गोड बोलून आपल्याला फसवले जात आहे. शिंदे-फडणवीसांची मिलीभगत आहे. मुंबईत मराठा मोर्चा दाखल झाल्यानंतर आंदोलकांवर हल्ला करण्याबाबत शिंदे गटातील मंत्र्यांमध्ये चर्चा झाल्याचा गंभीर पान ४ वर

## गणेशोत्सव काळात नांदेड जिल्ह्यात डॉल्बी सिस्टिमच्या वापरास प्रतिबंध



नांदेड/प्रतिनिधी-गणेशोत्सवाच्या कालावधीत नांदेड शहरासह जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच ध्वनिप्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यात डॉल्बी सिस्टिमच्या वापरास प्रतिबंध करणारा आदेश जारी केला आहे.

नांदेड शहर व जिल्ह्यात दहीहंडी, श्री गणेश स्थापना व श्री गणेश विसर्जन हे उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे करण्यात येतात. या कालावधीत डॉल्बी सिस्टिमचा वापर केल्यामुळे वृद्ध, गर्भवती महिला, लहान मुले तसेच आजारी नागरिकांना त्रास होण्याची शक्यता असते. डॉल्बीच्या मोठ्या आवाजामुळे नागरिकांच्या कानांवर, हृदयावर व आरोग्यावर परिणाम होण्याबरोबरच जीवितासही धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सार्वजनिक शांतता व सुरक्षिततेला बाधा निर्माण होऊ नये, यासाठी हा प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आला आहे. ७ सप्टेंबर रोजी मध्यरात्री १२ वाजेपासून ८ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत नांदेड जिल्ह्यात डॉल्बी सिस्टिमचा वापर करण्यास अथवा चालविण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. डॉल्बी सिस्टिम मालक, चालक तसेच अन्य कोणत्याही व्यक्तीस डॉल्बी सिस्टिम वापरण्यास किंवा चालविण्यास मनाई करण्यात आली आहे. गणेशोत्सव, नवरात्र, पान ४ वर

## एमपीएससी पेपरफुटीविरोधात विद्यार्थ्यांचा आक्रोश

### जंतरमंतर पार्ट-२ करण्याचा इशारा

पुणे:एमपीएससी परीक्षेतील पेपरफुटी आणि गैरप्रकारांमध्ये आयोगातील अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याच्या आरोपांमुळे राज्यभरातील विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. सोमवारी पुणे आणि कोल्हापूर येथे हजारो विद्यार्थ्यांनी आंदोलन करत सरकारचे लक्ष वेधले.

पुण्यात आ.रोहित पवार आणि खा.सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. तर कोल्हापुरात ऐतिहासिक दसरा चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. मागण्या मान्य न झाल्यास कोल्हापुरी पायताण दाखवून जंतरमंतर पार्ट-२ केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा विद्यार्थ्यांनी दिला.एमपीएससीचे अध्यक्ष व सचिव यांचा राजीनामा घेऊन स्वच्छ प्रतिमेच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, गट-ब परीक्षेतील आक्षेपांवर आठ दिवसांत स्पष्टीकरण देऊन गैरप्रकारांची चौकशी करावी, अशी प्रमुख मागणी आहे.

## कायद्याचे राज्य आहे की नाही?

### डॉक्टरांवरील हल्ल्यांवर सुप्रिम कोर्टाचा संतप्त सवाल

मुंबई/प्रतिनिधी-कायद्याचे राज्य आहे की नाही? डॉक्टरांवर हल्ले करणाऱ्या लोकांना रस्त्यावर मोकाट फिरायला नको, अशा शब्दांत डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांवरील वाढत्या हल्ल्यांची सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेत कठोर शब्दांत नाराजी व्यक्त केली. हल्लेखोरांवर कारवाईची गरज अधोरेखित केली.

डोंबिवलीतील डॉक्टर मारहाण प्रकरणाशी संबंधित सुनावणीदरम्यान पालघरमधील रुग्णालयात डॉक्टरांना झालेल्या मारहाणीच्या घटनेचाही उल्लेख झाला. दहीहंडीच्या कार्यक्रमात जखमी झालेल्या गोविंदाला रुग्णालयातून सुटी देण्यावरून डॉक्टर आणि काही शिवसेना पदाधिकाऱ्यांमध्ये वाद झाला होता. या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले.रुग्णालयात घुसून डॉक्टरांना शिवीगाळ आणि मारहाण करण्यात आल्याने या घटनेवर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. रुग्णालयातील मारहाणीचा प्रकार सीसीटीव्हीमध्ये कैद झाला असून, या प्रकरणी पोलिसांनी १७ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.डॉक्टरांवरील हल्लूयांमुळे वैद्यकीय क्षेत्रात असुरक्षिततेची भावना निर्माण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचे हे निरीक्षण महत्त्वाचे मानले जात आहे. रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णाच्या नातेवाईकांना किंवा कोणत्याही व्यक्तीला डॉक्टरांशी मतभेद असू शकतात; मात्र त्यासाठी कायदा हातात घेण्याचा अधिकार कोणालाही नाही, असा स्पष्ट संदेश न्यायालयाच्या भूमिकेतून देण्यात आला.दरम्यान, पालघर घटनेची दखल घेत शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनीही संबंधित पदाधिकाऱ्यांवर कारवाई केली. डॉक्टर आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना मारहाण करणे कोणत्याही परिस्थितीत योग्य नाही. कायदा हातात घेण्याचे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशारा शिंदे यांनी दिला.सर्वोच्च न्यायालयाच्या कठोर भूमिकेमुळे डॉक्टरांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, वैद्यकीय कर्मचाऱ्यांवरील हल्लूयांविरोधात कठोर कायदेशीर कारवाईची गरज अधोरेखित झाली आहे.

## हल्ल्यातील जखमी तरुणाचा मृत्यू

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील सिंचननगर भागात शनिवारी जुन्या वादातून एका तरुणावर तीक्ष्ण हत्याराने हल्ला करण्यात आला होता. हल्ल्यात जखमी झालेल्या तरुणाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे.

सिंचननगर परिसरातील बुद्ध विहारा जवळ शनिवार दि.४ सप्टेंबर रोजी प्रतिक ससाने याच्यावर मयुर लोणे व एका अल्पवयीन मुलाने तीक्ष्ण हत्याराने हल्ला केला. या हल्ल्यात प्रतिक ससाने हा गंभीर जखमी झाला. घटनेची माहिती समजताच भाग्यनगर पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. गंभीर जखमी झालेल्या प्रतिक ससाने यास उपचारासाठी तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारा दरम्यान आज (सोमवार) प्रतिक ससाने याचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी मयुर लोणे यास पोलीसांनी अटक केली असून भाग्यनगर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.




धनगर समाजाला अनुसुचित जमाती प्रवर्गातून आरक्षण लागू करावे या मागणीसाठी एका शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी यांची भेट घेवून निवेदन दिले. यावेळी माजी जि.प.सदस्य माणिकराव लोहगावे, भगवान हाके, छत्रपती कानोडे, महेंद्र देमगुंडे, एकनाथ धमने, भास्कर तळणे, शिवाजी होळकर, गजानन सरोदे, ॲड.जगदीश हाके व इतर उपस्थित होते.

## इसमाचे प्रेत सापडले

नांदेड/प्रतिनिधी-लालवाडी ब्रीज जवळील झुडपात एका इसमाचे प्रेत आज (सोमवार) सकाळी आढळून आले आहे.

लालवाडी ब्रीज जवळील डॉ. पल्लेवाड यांच्या रुग्णालयाच्या पाठीमागील झाडीझुडपात एक इसम मृत अवस्थेत आढळून आला. या घटनेची माहिती शिवाजीनगर पोलीस स्टेशनला दिली. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन प्रेत शासकीय रुग्णालयात पाठविले आहे. सदरील मयताची ओळख पटली असून तो शहरातील नागसेननगर भागात राहणारा असल्याचे सांगण्यात आले आहे.

## जिल्हात कोरडा दुष्काळ जाहीर करुन हेक्टरी एक लक्ष रुपये आर्थिक मदत द्या-संभाजी ब्रिगेड




नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करुन योग्य त्या उपायोजनेसह हेक्टरी एक लक्ष रूपये आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेड संघटनेच्यावतीने निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे.

नांदेड जिल्ह्यात दरवर्षीच्या तुलनेत १४० मिलीमीटर पाऊस कमी झाला आहे. गतवर्षी आज रोजी पर्यंत ८२६ मिलिमीटर पाऊस झाला होता यावर्षी मात्र ५२१ मिलिमीटर पावसाची नोंद आहे म्हणजे गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी ३०५ मिलीमीटर पाऊस कमी झाला आहे त्यामुळे सोयाबीन, कापुस व ईतर खरीप पिकांच्या उत्पादनावर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे. यंदाच्या खरीप हंगामाच्या सुरवातीला काही भागात समाधानकारक पाऊस झाला मात्र गेल्या काही दिवसांपासुन पाऊस न पडल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. सध्याचे दिवस हे सोयाबीन मध्ये शेंगा भरण्याचे व कापसाला बोंड येण्याचे आहेत या दिवसात जमिनीत ओलावा असणे गरजेचे होते परंतु कडक उन पडत आहे. भारतीय हवामान विभागाने गेल्या महिन्यात दोन वेळा यलो अलर्ट दिला होता मात्र अलर्टच्या काळात अपेक्षित पाऊस झाला नाही. पाऊस पान ४ वर

## पावसाची दडी,सोयाबीनवर 'यलो मोझॅक'चा घाला;उत्पादन २५ टक्क्यांवर येण्याची भीती

किनवट/प्रतिनिधी-ऑगस्ट मध्यापासून ते सप्टेंबरचा पहिला आठवडा संपला तरी पाऊस न झाल्याने हाती येणाऱ्या सोयाबीन पीकावर 'एलो मोझॉक' या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने झाडे पिवळे होऊन शेंगा पोचट होत आहेत. या नैसर्गिक आघातामुळे सोयाबीनच्या उत्पादनात प्रचंड घट होऊन केवळ २५% देखील सोयाबीन शेतकऱ्यांच्या हाती लागेल की नाही ? याबद्दल शेतीनिष्ठ शेतकऱ्यांनी चिंता व्यक्त केली आहे. त्यामुळे महसूल विभागाने मंत्र्यांच्या आदेशाची वाट न पहाता पंचनामे करून शासनाला अहवाल सादर करण्याच्या मागणीने जोर धरला आहे.

पावसाने दडी मारल्याने किनवट तालुक्यातील पीक परिस्थिती गंभीर बनली आहे. दररोज काळेकुट्ट आभाळ भरून येते पाऊस सदृश चित्र दिसते मात्र हुलकावणी देऊन निघुन जाते. ऑगस्ट मध्यापासून ते आजतागायतची पर्जन्यमान स्थिती दिसते. त्यातच सोयाबीन पीकांवर 'एलो मोझॉक' या रोगांच्या प्रादुर्भावामुळे सोयाबीनची झाडे पिवळे पडत आहेत. शेंगा भरण्याचा मोसम असतांना अशात पाऊस नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत कमालीची भर पडताना दिसते. पावसाअभावी आणि रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने शेंगा पोचट राहून उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता अटळ आहे. सततच्या ढगाळ वातावरणामुळे कापूस पीकावर मावा, तुडतुडे, थ्रिप्स, कोकडासारख्या अनेक रोगांच्या उपद्रवी किडींचा झपाट्याने प्रादुर्भाव वाढला आहे. किडींच्या हल्लूयामुळे कापसाच्या झाडांची वाढ खुंटत असून पाती व फुलांची संख्या कमालीची घटत आहे. कीड नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना वारंवार कीटकनाशकांच्या फवारण्या केल्या मात्र फारसा परिणाम जाणवत नाही. उत्पादन खर्चात मात्र मोठी वाढ झाली हे उल्लेखनीय म्हणता येईल. उन्हाचा तडाखाही पिकांना बसत आहे. पावसाने दडी मारली असून किनवट तालुक्यात दुष्काळाचे संकट घोंगावत आहे. अशा कठीण काळात शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे प्रशासनाने करण्याची मागणी बोधडी येथील अविनाश दराडे यांनी केली आहे.



## गणपती,महालक्ष्मी उत्सवानिमित्त नांदेड-हडपसर-नांदेड विशेष रेल्वे



नांदेड/प्रतिनिधी-गणपती व महालक्ष्मी उत्सवानिमित्त होणारी प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातर्फे विशेष रेल्वे सोडण्यात येणार आहे.

गाडी क्रमांक ०७६०७ नांदेड-हडपसर विशेष गाडी रविवार दि.२० सप्टेंबर २०२६ रात्री २१.०० वाजता नांदेड येथून सुटून पूर्णा, परभणी, सेलू, परतूर, जालना, छत्रपती संभाजीनगर, लासूर, नगरसूल, अंकाई, अहिल्यानगर व दौंड कॉर्ड लाईन मार्गे पुढे जाऊन हडपसर येथे दुसऱ्या दिवशी सोमवारी सकाळी ०९.४५ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०७६०८ हडपसरनांदेड विशेष गाडी सोमवार दि.२१ सप्टेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता हडपसर येथून सुटून दौंड कॉर्ड लाईन, अहिल्यानगर, अंकाई, नगरसूल, लासूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परतूर, सेलू, परभणी, पूर्णा मार्गे नांदेड येथे दुसऱ्या दिवशी मंगळवारी रात्री ००.३५ वाजता पोहोचेल.या विशेष रेल्वेगाडीला एकूण २४ आयसीएफ डबे असतील. त्यामध्ये वातानुकूलित डबे-३, शयनयान (स्लीपर) डबे-१०, सामान्य द्वितीय श्रेणी डबे-५, एसएलआर डबे-२ आणि सामान्य श्रेणी डबे-४, चा समावेश आहे. रेल्वे प्रशासनाने सणासुदीच्या काळात प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता या विशेष रेल्वेगाडीच्या सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# मग ध्वनीप्रदूषण थांबत का नाही?

**पुण्यातील डीजेविरोधातील मोर्चा हा केवळ एका व्यक्तीच्या किंवा एका सणाच्या विरोधातील आंदोलन म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. हा मोर्चा आपल्या व्यवस्थेतील एका जुन्या आणि गंभीर विसंगतीकडे लक्ष वेधतो. ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी कायदा आहे, नियम आहेत, मर्यादा आहेत; मग त्यांची अंमलबजावणी का होत नाही? कायदा कागदावर अस्तित्वात असूनही प्रत्यक्षात कर्णकर्कश आवाजाचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत असेल, तर प्रश्न कायद्याच्या अस्तित्वाचा नसून त्याच्या अंमलबजावणीचा आहे.ध्वनी प्रदूषणाबाबत देशात अनेक वर्षांपासून नियम अस्तित्वात आहेत. निवासी क्षेत्रात दिवसा ५५ डेसिबल आणि रात्री ४५ डेसिबल अशी ध्वनीमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे '५० डेसिबलच्या आसपास आवाजाची मर्यादा असावी' या चर्चेपेक्षा महत्त्वाचा मुद्दा असा की, सरकारने ठरवलेल्या ध्वनीमर्यादांचे प्रत्यक्ष पालन किती होते? सण-उत्सव, मिरवणुका, राजकीय कार्यक्रम अथवा अन्य सार्वजनिक कार्यक्रमांच्या वेळी नियमांची अंमलबजावणी होत नसेल, तर नियमांची उपयुक्तताच प्रश्नांकित होते. म्हणूनच पुण्यात नागरिकांना मोर्चा काढावा लागतो, आंदोलन करावे लागते आणि प्रशासनाचे लक्ष वेधावे लागते, हीच व्यवस्थेसाठी आत्मपरीक्षणाची बाब आहे. कायदा असताना नागरिकांनी रस्त्यावर उतरून 'कायदा लागू करा' अशी मागणी करावी लागणे हे कायद्याच्या कमकुवतपणापेक्षा अंमलबजावणीच्या यंत्रणेचे अपयश अधिक स्पष्ट करते. या पार्श्वभूमीवर विद्यानंद बापट यांची भूमिका चर्चेत आली आहे. डीजेविरोधात आवाज उठविणारे बापट हे काही पहिले व्यक्ती नाहीत. गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक कार्यकर्ते, नागरिक, डॉक्टर, पर्यावरणप्रेमी आणि संवेदनशील मंडळी ध्वनी प्रदूषणाविरोधात आवाज उठवत आहेत. मात्र बापट यांनी ही मागणी आक्रमक आणि काहीशी नावीन्यपूर्ण पद्धतीने समाजासमोर मांडली. त्यामुळे त्यांच्या आंदोलनाकडे व्यापक लक्ष गेले. त्यांच्या भूमिकेशी कोणाचे राजकीय किंवा वैयक्तिक मतभेद असू शकतात; परंतु ध्वनीप्रदूषणाचा मूलभूत प्रश्न त्यातून गौण होता कामा नये. उलट, एखाद्या सामाजिक प्रश्नासाठी आवाज उठविणाऱ्या व्यक्तीला आंदोलनाच्या वेळी मारहाण किंवा चापट खावी लागते, ही बाब अधिक गंभीर आहे. एखाद्या मागणीशी असहमती असेल तर तिचा प्रतिवाद विचाराने, चर्चेने आणि लोकशाही मार्गाने केला पाहिजे. हात उचलणे हा कोणत्याही लोकशाही समाजाचा स्वीकारार्ह मार्ग असू शकत नाही. बापट यांच्याशी घडलेल्या प्रकारामुळे डीजेचा प्रश्न केवळ आवाजाच्या पातळीपुरता राहात नाही; तो मतभेद सहन करण्याच्या आपल्या सामाजिक क्षमतेचाही प्रश्न बनतो. मात्र या सगळ्या वादात एक गोष्ट स्पष्टपणे सांगावी लागेल. ध्वनीप्रदूषणाचा विरोध हा कोणत्याही धर्माचा विरोध नाही. गणेशोत्सव असो, नवरात्र असो, ईदची मिरवणूक असो, ख्रिसमसचा कार्यक्रम असो, जयंती असो किंवा कोणत्याही राजकीय पक्षाचा कार्यक्रम असो; ध्वनीची मर्यादा सर्वांसाठी समान असली पाहिजे. कायदा जर सर्वांसाठी समान असेल तर त्याची अंमलबजावणीही सर्वांवर समान झाली पाहिजे. एका धर्माच्या कार्यक्रमात नियम लागू करणे आणि दुसऱ्याच्या कार्यक्रमात डोळेझाक करणे, हा न्याय नाही. प्रश्न डीजेचा आहे म्हणून तो केवळ गणेशोत्सवापुरता मर्यादित करण्याचीही गरज नाही. डीजे, लाऊडस्पीकर, मिरवणुका आणि इतर ध्वनिवर्धक साधनांचा वापर करताना निर्धारित मर्यादा पाळणे आवश्यक आहे. उत्सवाचा अधिकार महत्त्वाचा आहे; पण शांततेत जगण्याचा नागरिकांचा अधिकारही तितकाच महत्त्वाचा आहे. एका व्यक्तीच्या किंवा समूहाच्या मनोरंजनासाठी हजारो नागरिकांना कर्णकर्कश आवाज सहन करायला लावणे ही उत्सवाची व्याख्या होऊ शकत नाही. यासाठी प्रशासनाने केवळ उत्सवाच्या काळात घोषणा करून भागणार नाही. ध्वनीपातळी मोजण्यासाठी पुरेशी यंत्रणा, तक्रारींवर तातडीने प्रतिसाद, नियम भंगाची नोंद आणि दोषींवर निश्चित कारवाई अशी कायमस्वरूपी व्यवस्था उभी करावी लागेल. 'वर्षातून एकदाच सण येतो' हा युक्तिवाद कायद्याला पर्याय ठरू शकत नाही. वर्षातून एकदाच होणारा त्रासही कायद्याने ठरवलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असेल तर तो त्रासच आहे.आज पुण्यातून उठलेला आवाज म्हणूनच गांभीर्याने घेण्याची गरज आहे. हा आवाज डीजेविरोधातील असला तरी त्यामागची मागणी व्यापक आहे; कायदा करा, नियम करा आणि मग त्यांची अंमलबजावणीही करा. नागरिकांना स्वतःच्या हक्कासाठी वारंवार रस्त्यावर उतरावे लागू नये, हीच कोणत्याही सक्षम लोकशाही व्यवस्थेची कसोटी आहे. उत्सव बंद करण्याची मागणी नाही; उत्सवाचे स्वरूप बदलण्याचीही सक्ती नाही. मागणी एवढीच. उत्सव करा, पण कायद्याच्या चौकटीत करा. श्रद्धा जपा, पण दुसऱ्याच्या शांततेचा अधिकारही जपा. आवाज करा, पण तो कर्णकर्कश होणार नाही याची जबाबदारी घ्या. विद्यानंद बापट पहिले नाहीत आणि कदाचित शेवटचेही नसतील. पण त्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहिलेला प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आता प्रश्न बापट विरुद्ध डीजे असा नसून कायदा विरुद्ध कायद्याची अंमलबजावणी असा आहे. या प्रश्नाचे उत्तर प्रशासनाने द्यायचे आहे.कायदा असूनही जर नागरिकांना मोर्चे काढावे लागत असतील, तर दोष कायद्यात आहे की; तो राबविणाऱ्यांमध्ये, याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे.**

# राजे उमाजी नाईक : स्वराज्याची ज्वाला



**डॉ.राजेंद्र बगाटे**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा केवळ काही मोजक्या राजकीय नेत्यांच्या कार्याचा इतिहास नाही. या इतिहासाच्या पाठीशी असंख्य ज्ञात-अज्ञात व्यक्ती, समाजघटक, कष्टकरी आणि वंचित जनसमुदायांच्या त्यागाची, संघर्षाची आणि स्वाभिमानाची परंपरा उभी आहे. परकीय सत्तेविरुद्धचा असंतोष देशाच्या कानाकोपऱ्यात वेगवेगळ्या स्वरूपात व्यक्त होत होता. महाराष्ट्राच्या भूमीतही ब्रिटिश सत्तेच्या विस्ताराला प्रारंभीच विरोध करणाऱ्या अनेक धाडसी व्यक्तींनी आपल्या परीने प्रतिकार उभारला. या आरंभीच्या ब्रिटिशविरोधी संघर्षातील एक महत्त्वाचे आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे राजे उमाजी नाईक. ७ सप्टेंबर हा त्यांचा जयंतीदिन. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे केवळ एका शूर व्यक्तीला अभिवादन करणे नव्हे, तर स्वाभिमान, स्वराज्य, अन्यायाविरुद्धचा प्रतिकार आणि सामान्य माणसाच्या हक्कांसाठी उभे राहण्याच्या मूल्यांचे स्मरण करणे होय.

राजे उमाजी नाईक यांचा जन्म ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील भिवडी (पुरंदर किल्ला) येथे झाला. त्यांचे वडील दादाजी खोमणे हे पुरंदर किल्ल्याच्या रखवालदारीशी संबंधित होते. त्या काळात रामोशी समाजातील अनेक कुटुंबांवर किल्ल्यांची राखण, रात्रीची गस्त, पहारा आणि सुरक्षा यांसारख्या जबाबदाऱ्या सोपविल्या जात. या पारंपरिक कामामुळे या समाजातील लोकांमध्ये धैर्य, शारीरिक कणखरपणा, संकटांचा सामना करण्याची क्षमता आणि परिसराची सूक्ष्म माहिती असण्याचे कौशल्य विकसित झाले होते. उमाजी नाईक यांचे बालपणही अशाच वातावरणात गेले. तलवार, भाला, कुऱ्हाड, धनुष्यबाण, गोफण आणि दांडपट्टा यांसारख्या शस्त्रांच्या वापराचे त्यांनी शिक्षण घेतले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साहसाबरोबरच परिस्थितीचा अंदाज घेण्याची आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित झाली.

उमाजी नाईक यांच्या आयुष्याला निर्णायक वळण देणारी परिस्थिती ब्रिटिश सत्तेच्या विस्तारामुळे निर्माण झाली. ईस्ट इंडिया कँपनीने महाराष्ट्रातील राजकीय आणि प्रशासकीय वर्चस्व वाढविल्यानंतर पारंपरिक सत्ताकेंद्रे आणि स्थानिक व्यवस्था विस्कळीत होऊ लागल्या. अनेक समाजघटकांचे पारंपरिक अधिकार आणि उपजीविकेची साधने हिरावली जाऊ लागली. रामोशी समाजालाही या बदलाचा मोठा फटका बसला. पुरंदर किल्ल्याच्या रखवालदारीसारख्या पारंपरिक जबाबदाऱ्यांपासून त्यांना दूर करण्याचे प्रयत्न झाले. वतने, जमिनी आणि पारंपरिक अधिकारांवर मर्यादा येऊ लागल्या. त्यामुळे केवळ आर्थिक प्रश्न निर्माण झाला नाही, तर समाजाच्या स्वाभिमानालाही धक्का बसला. आपल्या पूर्वजांपासून चालत आलेल्या जबाबदाऱ्या आणि अधिकार अचानक परकीय सत्तेच्या निर्णयामुळे संपुष्टात येत असल्याची भावना उमाजी नाईक यांच्या मनात तीव्र झाली. या परिस्थितीत उमाजी नाईकांनी अन्याय स्वीकारण्याऐवजी प्रतिकाराचा मार्ग स्वीकारला. त्यांच्या नेतृत्वाखाली रामोशी समाजातील अनेक लोक एकत्र आले. मात्र त्यांचा संघर्ष केवळ एका समाजाच्या तक्रारींपुरता मर्यादित राहिला नाही. स्थानिक जनतेवर होणारे आर्थिक शोषण, अन्याय आणि अधिकारशाली घटकांकडून होणारी पिळवणूक यांच्याविरुद्धही त्यांनी आवाज उठविला. सावकार, जमीनदार आणि सामान्य जनतेचे शोषण करणाऱ्या घटकांविषयी त्यांचा रोष होता. त्यामुळे त्यांच्या संघर्षामध्ये राजकीय स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक आणि आर्थिक न्यायाची आकांक्षाही दिसून येते. तत्कालीन ग्रामीण समाजातील विषमता आणि असुरक्षितता लक्षात घेतल्यास उमाजी नाईकांच्या नेतृत्वामागे सामान्य लोकांच्या असंतोषाची मोठी पार्श्वभूमी होती.

उमाजी नाईकांचे सर्वांत प्रभावी सामर्थ्य म्हणजे त्यांचे संघटनकौशल्य. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना केवळ शस्त्रे हाताळण्याचे प्रशिक्षण दिले नाही, तर परिस्थितीनुसार हालचाल करण्याची, गुप्त माहिती मिळविण्याची आणि ब्रिटिशांच्या सैन्यव्यवस्थेला चकवा देण्याची पद्धत विकसित केली. डोंगर-दऱ्या, जंगल, घाटवाटा आणि दुर्गम प्रदेश यांची त्यांना चांगली माहिती होती. या भौगोलिक ज्ञानाचा त्यांनी प्रभावी उपयोग केला. ब्रिटिश सैन्याची संख्या आणि साधने अधिक असतानाही स्थानिक परिस्थितीचा लाभ घेऊन उमाजी नाईकांच्या सहकाऱ्यांनी त्यांना अनेकदा अडचणीत आणले. अचानक हल्ला करून माघार घेणे, शत्रूच्या हालचालींवर लक्ष ठेवणे आणि सुरक्षित ठिकाणी आश्रय घेणे या छापामार पद्धती त्यांच्या संघर्षाचे वैशिष्ट्य ठरल्या. त्यांच्या या संघर्षात अनेक सहकाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. उमाजी नाईकांचे नेतृत्व वैयक्तिक शौर्यावर आधारित असले तरी त्यामागे संघटित लोकशक्ती होती. हीच त्यांच्या चळवळीची खरी ताकद होती. ब्रिटिशांच्या आधुनिक सैनिकी यंत्रणेसमोर स्थानिक लोकांच्या सहकार्याने उभा केलेला हा प्रतिकार त्या काळच्या परिस्थितीत अत्यंत धाडसी होता. त्यांच्या हालचालींमुळे ब्रिटिश प्रशासनाला मोठी चिंता निर्माण झाली. एका विशिष्ट प्रदेशापुरता मर्यादित न राहता हा असंतोष व्यापक होऊ शकतो, याची जाणीव ब्रिटिशांना झाली होती. उमाजी नाईकांच्या संघर्षातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्वराज्याची त्यांची कल्पना. त्यांनी स्वतःला राजे म्हणून संबोधले आणि ब्रिटिशांच्या प्रशासकीय सत्तेला पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. काही ठिकाणी त्यांनी न्यायनिवाड्याची व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न केला. १८२७ मध्ये त्यांच्या जाहीर आवाहनातून ब्रिटिशांच्या महसूलव्यवस्थेला सहकार्य न करण्याचा आणि परकीय सत्तेविरुद्ध उभे राहण्याचा संदेश देण्यात आला. ही भूमिका त्या काळातील परिस्थितीत अत्यंत धाडसी होती. ब्रिटिश सत्ता हळूहळू आपले प्रशासकीय जाळे मजबूत करत असताना तिच्या महसूलव्यवस्थेला विरोध करणे म्हणजे त्यांच्या शासनव्यवस्थेच्या मुळालाच आव्हान देणे होते.

१८३१ मधील उमाजी नाईकांचा जाहीरनामा त्यांच्या राजकीय विचारांच्या व्यापकतेचे महत्त्वपूर्ण उदाहरण मानला जातो. या आवाहनातून ब्रिटिश सत्तेविरुद्ध व्यापक प्रतिकार उभारण्याची भूमिका स्पष्ट होते. ब्रिटिशांना महसूल देऊ नये, त्यांच्या सत्तेला सहकार्य करू नये आणि आपल्या भूमीच्या स्वाधिकारासाठी संघर्ष करावा, असा त्यामागील संदेश होता. विशेष म्हणजे या आवाहनाचा विस्तार एका समाजापुरता किंवा एका गावापुरता मर्यादित नव्हता. हिंदुस्थानातील विविध घटकांनी एकत्र येऊन परकीय सत्तेविरुद्ध उभे राहावे, अशी त्यांची भूमिका होती. आधुनिक राष्ट्रवादाची संकल्पना त्या काळात आजच्या अर्थाने विकसित झालेली नसली तरी परकीय सत्तेविरुद्ध व्यापक जनप्रतिरोधाची कल्पना त्यांच्या विचारांमध्ये दिसून येते. म्हणूनच उमाजी नाईकांच्या कार्याचा अभ्यास केवळ स्थानिक बंड किंवा उठाव म्हणून न करता भारतीय स्वातंत्र्याच्या आरंभीच्या प्रतिकारपरंपरेच्या संदर्भात करणे आवश्यक ठरते.

उमाजी नाईकांच्या जीवनात संघर्षाबरोबरच चढ-उतारही आले. काही काळ त्यांनी ब्रिटिशांशी तडजोड केली आणि आत्मसमर्पण केले. त्यांना ब्रिटिश प्रशासनाकडून काही जबाबदारीही देण्यात आली. पुणे आणि सातारा परिसरातील शांतता राखण्याचे काम त्यांच्याकडे सोपविण्यात आले होते. परंतु ब्रिटिश प्रशासन आणि उमाजी नाईक यांच्यातील मूलभूत अविश्वास दूर झाला नाही. त्यांच्या हालचालींविषयी पुन्हा संशय निर्माण झाला आणि ब्रिटिशांनी त्यांच्यावर लक्ष केंद्रित केले. यावरून त्यांच्या जीवनातील संघर्ष हा एका सरळ रेषेत चाललेला नव्हता, तर तत्कालीन राजकीय परिस्थिती, स्थानिक संबंध आणि ब्रिटिश धोरणे यांच्याशी सतत झुंज देत पुढे गेलेला होता. ब्रिटिश प्रशासनाने उमाजी नाईकांना पकडण्यासाठी अनेक प्रयत्न केले. त्यांच्याविषयी माहिती मिळविण्यासाठी स्थानिक पातळीवर जाळे निर्माण करण्यात आले. अखेरीस ८ ऑगस्ट १८३१ रोजी त्यांच्या पकडीसाठी दहा हजार रुपयांचे मोठे बक्षीस आणि चारशे बिघे जमीन देण्याची घोषणा करण्यात आली. या घोषणेवरून उमाजी नाईक ब्रिटिश प्रशासनासाठी किती मोठे आव्हान ठरले होते, याची कल्पना येते. दीर्घकाळ त्यांचा शोध घेतल्यानंतर विश्वासघातामुळे त्यांना पकडण्यात ब्रिटिशांना यश आले. १५ डिसेंबर १८३१ रोजी उमाजी नाईक ब्रिटिशांच्या ताब्यात आले. त्यानंतर त्यांच्यावर खटला चालविण्यात आला आणि त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली.

३ फेब्रुवारी १८३२ रोजी पुण्यात उमाजी नाईकांना फाशी देण्यात आली. एका तरुण वयात सुरू झालेला त्यांचा संघर्ष अशा प्रकारे संपला; परंतु त्यांच्या बलिदानाने निर्माण केलेली प्रेरणा संपली नाही. उलट त्यांच्या मृत्यूनंतरही ब्रिटिशविरोधी प्रतिकाराच्या इतिहासात त्यांचे नाव कायम राहिले. १८४७ च्या व्यापक उठावापूर्वीच भारताच्या विविध भागांत परकीय सत्तेविरुद्ध असंतोष आणि प्रतिकाराची विविध रूपे दिसत होती. महाराष्ट्रातील या आरंभीच्या प्रतिकारपरंपरेत उमाजी नाईकांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांच्या जीवनातून हे स्पष्ट होते की स्वातंत्र्याची आकांक्षा केवळ उच्चभ्रू किंवा राजकीय नेतृत्वापुरती मर्यादित नव्हती; ती सामान्य लोकांच्या मनातही खोलवर रुजलेली होती. उमाजी नाईकांच्या इतिहासाचा विचार करताना वंचित आणि उपेक्षित समाजघटकांच्या योगदानाचा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो. इतिहासलेखनामध्ये अनेकदा राजे, सरदार, युद्धे आणि मोठ्या राजकीय घटनांना केंद्रस्थानी ठेवले जाते. मात्र त्या घटनांच्या पाठीमागे सामान्य जनतेचे योगदान, स्थानिक उठाव आणि सामाजिक संघर्ष दडलेले असतात. उमाजी नाईकांचा इतिहास या दुर्लक्षित बाजूकडे आपले लक्ष वेधतो. एका पारंपरिक व्यवसायावर आणि जीवनपद्धतीवर अवलंबून असलेल्या समाजघटकाने परकीय सत्तेच्या हस्तक्षेपाला दिलेला प्रतिकार हा सामाजिक इतिहासाचा महत्त्वपूर्ण भाग आहे. म्हणूनच त्यांच्या कार्याचे मूल्यमापन केवळ शौर्यकथेच्या चौकटीत न करता सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संदर्भात केले पाहिजे. आज आपण लोकशाही आणि संविधानाच्या आधारावर चालणाऱ्या भारतात जगत आहोत. त्यामुळे उमाजी नाईकांच्या संघर्षाचा अर्थ त्यांच्या काळातील सशस्त्र प्रतिकाराची पुनरावृत्ती असा घेणे योग्य ठरणार नाही. त्यांच्या जीवनातून आजच्या समाजाने घ्यायचा संदेश वेगळा आहे. अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे, आपल्या अधिकारांची जाणीव ठेवणे, शोषित आणि दुर्बल घटकांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहणे आणि लोकशाही मार्गाने परिवर्तन घडवून आणणे ही त्यांच्या स्मृतीची आधुनिक व्याख्या ठरू शकते. आज अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी संविधान, कायदा, न्यायव्यवस्था, प्रसारमाध्यमे, सामाजिक संघटना आणि लोकशाही संस्था आपल्याकडे आहेत. या साधनांचा जबाबदारीने आणि विवेकपूर्ण वापर करणे हीच आधुनिक काळातील संघर्षाची दिशा आहे.

उमाजी नाईकांच्या जयंतीचे महत्त्व म्हणूनच केवळ एका ऐतिहासिक व्यक्तीचे स्मरण करण्यापुरते मर्यादित राहता कामा नये. त्यांच्या जीवनातील स्वाभिमान, धैर्य, संघटनशक्ती आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची वृत्ती आजच्या पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. विशेषतः तरुणांनी इतिहासाकडे केवळ गौरवगाथा म्हणून न पाहता चिकित्सक दृष्टीने पाहिले पाहिजे. कोणत्या सामाजिक परिस्थितीत एखादा संघर्ष निर्माण झाला, त्यामागे कोणते आर्थिक आणि राजकीय घटक होते, सामान्य लोकांची भूमिका काय होती आणि त्या संघर्षातून पुढील समाजाला काय शिकता येते, याचा अभ्यास झाला पाहिजे. अशा अभ्यासातून इतिहास जिवंत होतो आणि वर्तमानाला दिशा देण्याची क्षमता त्याला प्राप्त होते. आजही समाजात आर्थिक विषमता, सामाजिक भेदभाव, संधीतील असमानता, शोषण आणि दुर्बल घटकांच्या अधिकारांचे प्रश्न पूर्णपणे संपलेले नाहीत. विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे, प्रत्येकाला शिक्षणाची आणि प्रगतीची समान संधी देणे, श्रमाचा सन्मान करणे आणि मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण करणे ही आधुनिक लोकशाहीची जबाबदारी आहे. उमाजी नाईकांच्या स्मृतीचे खरे सार याच मूल्यांमध्ये आहे. त्यांच्या नावाने कार्यक्रम आयोजित करणे, प्रतिमेला पुष्पहार अर्पण करणे किंवा घोषवाक्ये देणे यापलीकडे जाऊन त्यांच्या संघर्षाचा सामाजिक आशय समजून घेणे गरजेचे आहे. इतिहासातील नायकांच्या स्मृती तेव्हाच अर्थपूर्ण ठरतात, जेव्हा त्या वर्तमानातील समाजनिर्मितीशी जोडल्या जातात. राजे उमाजी नाईक हे महाराष्ट्राच्या इतिहासातील स्वाभिमानाचे आणि प्रतिकाराचे तेजस्वी प्रतीक आहेत. त्यांनी ज्या काळात ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष केला, तो काळ अत्यंत प्रतिकूल होता. साधनांची कमतरता, संघटित ब्रिटिश सैन्य, राजकीय दबाव आणि सततचा पाठलाग या सर्व परिस्थितींमध्ये त्यांनी आपल्या ध्येयाचा पाठपुरावा केला. त्यांच्या जीवनाचा शेवट फाशीच्या दोरीवर झाला; मात्र त्यांचा विचार आणि संघर्षाचा वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. त्यांच्या जीवनाकडे पाहताना आपल्याला जाणवते की स्वातंत्र्य ही केवळ राजकीय सत्ता हस्तगत करण्याची संकल्पना नसून ती माणसाला सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारी मूल्यव्यवस्था आहे.

७ सप्टेंबरला राजे उमाजी नाईक जयंती साजरी करताना म्हणूनच त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्याबरोबरच समाजातील अन्याय आणि विषमता कमी करण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे. स्वाभिमानाची ज्योत ज्ञानाने अधिक प्रखर करणे, लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणे, दुर्बलांच्या हक्कांसाठी उभे राहणे आणि सामाजिक समतेच्या दिशेने वाटचाल करणे हीच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल. उमाजी नाईकांनी परकीय सत्तेविरुद्ध पेटविलेली प्रतिकाराची ज्वाला आज संविधानिक मूल्यांच्या प्रकाशात पुढे नेण्याची गरज आहे. त्यांच्या स्मृतीतून धैर्य घ्यावे, त्यांच्या संघर्षातून स्वाभिमान शिकावा आणि त्यांच्या जीवनातून न्याय्य समाजनिर्मितीची प्रेरणा घ्यावी. इतिहासातील त्यांचे स्थान केवळ भूतकाळात नाही; अन्यायाविरुद्ध जागृत राहणाऱ्या प्रत्येक पिढीच्या वर्तमानात आणि भविष्यातही राजे उमाजी नाईकांची स्वराज्याची हाक निनादत राहील.

## ...मस्त आहे!

कुठे आंदोलन,
कुठे मोर्चे,
सगळीकडे (बे) शिस्त आहे,
दिसतंय का तुम्हाला?
सर्व काही मस्त आहे!
विकासाचा दर वाढला,
साखरेचा भाव चढला,
जाळीतला कांदा सडला,
दिसतंय का तुम्हाला?
सगळं काही मस्त आहे!
करणारे करून मेले,
करणारे करून गेले,
सर्वकाही स्वस्त आहे,
दिसतंय का तुम्हाला?
सगळं काही मस्त आहे!
डॉक्टर असो वा कंपाउंडर,
फूडवाल्यांचं नशीब असो,
फुटणारा फुटत गेला,
विकणारा विकत गेला,
सगळं काही फस्त आहे,
दिसतंय का तुम्हाला?
सगळं काही मस्त आहे!
जाडजूड चमडीला
बातम्यांचा लेप आहे,
कुणाला काही वाटत नाही,
रोज रोज तेच आहे,
दिसतंय का तुम्हाला?
सगळं काही मस्त आहे!

**- डॉ.दिलीप शिंदे,**
लोहगावकर (नांदेड)

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# हमाल-माथाडी कामगारांचे २८ सप्टेंबरपासून पुण्यात आंदोलन

नांदेड/प्रतिनिधी- हमाल-मापाडी कामगारांच्या रोजगारावर गदा आणण्याच्या राज्य सरकारच्या प्रयत्नाविरोधात २८ सप्टेंबरपासून पुण्यातील कौन्सिल हॉलसमोर आंदोलन करण्यात येणार आहे.

सोमवारी नांदेड हमाल-मापाडी हातगाडा संघटनेच्या वतीने शासकीय धान्य गोदामातील हमाल कामगारांच्या विविध मागण्यांसाठी निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांना भेटून निवेदन देण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष रावसाहेब कांबळे, शिवाजी दराडे, सचिव चंद्रकांत कोलते, उपसचिव आनंद कोकरे, कोषाध्यक्ष गंगाधर नरवाडे व संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. राज्यातील शासकीय धान्य गोदामांमध्ये वर्षानुवर्षे कष्ट करून शासनाची धान्य वितरण व्यवस्था सुरळीत ठेवणाऱ्या हजारो हमाल-माथाडी कामगारांच्या रोजगारावर गदा आणण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही. कामगारांचा रोजगार आणि त्यांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह वाचविण्यासाठी राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडण्यात येणार आहे.

# पिके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची धावाधाव

माहूर/प्रतिनिधी-पावसाळा सुरू होऊन तीन महिने उलटले असतानाही समाधानकारक पाऊस न झाल्याने खरीप हंगामातील पिके संकटात सापडली आहेत. पावसाने दडी मारल्याने अंकुरलेली पिके करपू लागली असून पिकांची वाढ खुंटली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून पिके वाचविण्यासाठी शेतकरी विहिरीतील उपलब्ध संरक्षित पाण्यावर तुषार सिंचन करून पिके जगविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत.



परिसरात यंदा पावसाचे दिवस कमी तर ढगाळ वातावरणाचे दिवस अधिक राहिले. अधूनमधून झालेल्या रिमझिम पावसामुळे जमिनीत काही प्रमाणात ओलावा निर्माण झाला; मात्र मोठा आणि समाधानकारक पाऊस न झाल्याने पिकांना आवश्यक पाणी मिळालेले नाही. परिणामी कापूस, सोयाबीनसह अन्य खरीप पिकांच्या वाढीवर मोठा परिणाम झाला आहे. काही ठिकाणी पिकांची पाने पिवळी पडू लागली असून मुळाजवळील भाग करपत असल्याचे शेतकरी सांगत आहेत. काही भागांत पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव वाढल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. सध्या कपाशीचे पीक पाते लागणे, फुलोरा आणि बोंडधारणेच्या अवस्थेत आहे. या महत्त्वाच्या कालावधीत पिकाला पाण्याचा ताण पडल्यास झाडांची वाढ खुंटून पिके वाळण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकरी उपलब्ध पाण्याचा वापर करून तुषार सिंचनाच्या माध्यमातून कपाशी वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत. दुसरीकडे सोयाबीनचे पीक वाढीच्या, फुलोरा आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत आहे. या काळात आवश्यक ओलावा न मिळाल्यास झाडे सुकण्याबरोबरच शेंगांची संख्या आणि दाणे भरण्यावर परिणाम होऊन उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. पेरणीनंतर पिकांना पोषक असा पाऊस न मिळाल्याने खरीप हंगामावर दुष्काळसदृश संकटाची छाया गडद होत आहे. पावसाची प्रतीक्षा करत असतानाच उपलब्ध विहिरीतील पाण्याचा आधार घेत पिके जगविण्यासाठी शेतकऱ्यांची धावाधाव सुरू आहे. आता खरीप पिकांना जीवदान देण्यासाठी दमदार पावसाची नितांत गरज असून पाऊस आणखी लांबल्यास शेतकऱ्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

# जिल्हा परिषदेत राजे उमाजी नाईक जयंतीनिमित्त अभिवाद

नांदेड/प्रतिनिधी- जिल्हा परिषदेच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती आज उत्साहात साजरी करण्यात आली.



यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार आणि जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक मयूरकुमार आंदेलवाड यांनी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक बालाजी नागमवाड, अशोक मोकले, प्रल्हाद थोरवटे, गजेंद्र श्रीरामवार, सूरज नाईक, शिवसाभ चेड्डु, प्रकाश तुतुरवाड, रामदास शेकापुरे, रविशंकर बोडके, बालाजी आवर्दे, मिलिंद व्यवहारे, शिवराज कोल्हे, सौरभ सावरकर, प्रथमेश पांचाळ, रवी येन्नावार, स्नेहल वळसे, पूजा सोनटक्के, राजरत्न ढोले, दुलबाजी हुरदुके यांच्यासह जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# श्री शिवाजी कॉलेज पतसंस्थेवर राठोड-वाघमारे यांचा विजय

कंधार/प्रतिनिधी-श्री शिवाजी कॉलेज कंधार सेवक सहकारी पतसंस्थेच्या सर्वसाधारण मतदारसंघातील दोन रिक्त संचालकपदांसाठी झालेल्या निवडणुकीत प्रा. डॉ. संतोष राठोड आणि प्रा. सुभाष वाघमारे यांनी विजय मिळविला. तीन उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने या निवडणुकीकडे महा-विद्यालयीन सेवकवर्गाचे लक्ष लागले होते.



महाविद्यालयात झालेल्या या निवडणुकीत दोन संचालकपदांसाठी प्रा. डॉ. संतोष राठोड, प्रा. सुभाष वाघमारे आणि प्रा. हनुमंते चंद्रकला हे तीन उमेदवार आमनेसामने होते. मतदारांनी गुप्त मतदान पद्धतीने आपला कौल दिल्यानंतर मतमोजणी करण्यात आली. मतमोजणीअंती प्रा. डॉ. संतोष राठोड आणि प्रा. सुभाष वाघमारे यांच्या विजयाची अधिकृत घोषणा करण्यात आली. निवडणूक प्रक्रिया अत्यंत शांततापूर्ण आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून एन. एम. पंडित यांनी कामकाज पाहिले. निवडणुकी दरम्यान पतसंस्थेचे पदाधिकारी व संचालक उपस्थित होते. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन एम. आर. कदम, व्हाईस चेअरमन तुषार आगलावे, सचिव प्रा. संतोष गुट्टे, यांच्यासह संचालक उपस्थित होते. नवनिर्वाचित संचालक प्रा. डॉ. संतोष राठोड आणि प्रा. सुभाष वाघमारे यांचा पतसंस्थेच्या वतीने सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

# प्रा.गणेश क्यादारे यांना पीएचडी प्रदान

देगलूर/प्रतिनिधी-अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील प्रा.गणेश क्यादारे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्याकडून पीएच.डी. प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी संशोधन मार्गदर्शक डॉ. एस. बी. पटवारी यांच्या मार्गदर्शनाख़ाली क्रोमियम व्हीआय कॉम्प्लेक्सचा ब्रोमिनेटिंग एजंट्स म्हणून अभ्यासएक गतिशास्त्रीय आणि क्रियापद्धतीविषयक दृष्टिकोन या विषयावर संशोधन पूर्ण केले आहे.

त्यांनी प्राप्त केलेल्या या यशाबदल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर, उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सचिव डॉ.कर्मवीर उनग्रतवार, सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य सूर्यकांत नारलावार, देवेंद्र मोतेवार, गंगाधरराव जोशी, रवींद्रअप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य डॉ.एम. एम. चमकुडे, उपप्राचार्य डॉ.व्ही.जी.शेरीकर, पर्यवेक्षक संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांच्यासह महाविद्यालयाचे शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

# भक्तिरसात रंगला शिवमहापुराण कथेचा सांगता सोहळा

नांदेड/प्रतिनिधी- शहरातील गणेश नगर मधील श्री गणेश मंदिरात गेल्या काही दिवसांपासून भक्तिमय वातावरणात सुरू असलेल्या शिवमहापुराण कथेचा समारोप सोहळ्यात श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. शिवमहापुराणातील विविध प्रसंग, भगवान शिवाचे महात्म्य, भक्तीची शक्ती आणि मानवी जीवनाला दिशा देणारे विचार यांचे अत्यंत रसाळ व भावपूर्ण निरूपण करण्यात आले.

संगीतमय समर्थ भक्त श्री. राघवेंद्र महाराज देशपांडे यांनी आपल्या ओघवत्या वाणीने शिवमहापुराणातील कथाभाग भक्तांसमोर सादर केला. त्यांच्या कथनाला भावपूर्ण संगीताची साथ लाभल्याने संपूर्ण वातावरण शिवभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाले. तबला : आदित्य उपाध्ये आणि पेटी : दत्तात्रय वर्तक यांच्या सुरेल साथीने कथेला अधिकच भावस्पर्शी उंची प्राप्त झाली. कथा, अभंग, भजन, श्लोक आणि संगीताच्या माध्यमातून भक्तांना भगवान शिवाच्या स्वरूपाचे आध्यात्मिक दर्शन घडले. संगीत, कथा आणि भक्तीचा सुरेल त्रिवेणी संगम साधत झालेला हा शिवमहापुराण सांगता सोहळा भाविकांच्या स्मरणात कायम राहणारा ठरला. श्रद्धेने भारावलेल्या वातावरणात हर हर महादेवच्या जयघोषात कथेची भक्तिमय सांगता झाली.

# मुरुम वाहतूक करणारा हायवा जप्त

नांदेड/प्रतिनिधी-उस्माननगर ते किवळा रोडवर अवैधरित्या मुरुम वाहतूक करणारा हायवा जप्त करण्यात आला असून या प्रकरणी दोन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उस्माननगर ते किवळा रोडवर शनिवारी दुपारी उस्माननगर पोलीस स्टेशनचे पथक गस्त घालीत असतांना हायवा वाहन क्र.एमएच २६ सीव्ही-४३१२ हे भरधाव वेगात जातांना आढळून आले. पोलीसांनी हायवा चालकास इशारा करुन वाहन थांबविले. त्यामध्ये पाच ब्रास मुरुम पोलीसांना आढळून आला. मुरुम वाहतुकीविषयी कोणत्याही प्रकारचे कागदपत्र वाहन चालकाकडे नव्हते. याप्रकरणी पोलीसांनी उस्माननगर पोलीस ठाण्यात मनोज लक्ष्मण सरवर व अन्य एका जणाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलीसांनी वाहन व मुरुम जप्त केले आहे.

# मरिबा थोटे यांचे निधन

कंधार/प्रतिनिधी-जांब (बु) ता.मुखेड येथील प्रसिद्ध आडत व्यापारी मरिबा जयवंता थोटे (वय ८५) यांचे रविवारी, दि.६ सप्टेंबर रोजी दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले आहे.



त्यांच्या पार्थिवावर सोमवारी, दि.७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता स्मशानभूमी, जांब (बु) ता.मुखेड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, बहिण, भाऊ, चार मुले, सुना, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. मेजर लक्ष्मण थोटे, इंजिनिअर किशोर थोटे, विलास थोटे, पत्रकार मुरलीधर थोटे यांचे ते वडील होतं.


CHANGE IN NAME

My (old name) is **SHARIF FAROOQ** which now I am, changing as (new name) **FAROOK SHARIF**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**FAROOK SHARIF**
R/o 6-4-94, SARAFA ROAD
CHOWK BAZAR ITWARA, NANDED-431604
Mob. No.8446448836

जा.क्र.२-क्षेका/नांवाशमनपा/७४२/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : ०४/०९/२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.क्षे.का.२/NT/१४८९८/४०/२०२६-२७**

**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री. **पंडीत शिवाजी पाटील** रा.**नंदीग्राम सोसायटी,**नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, **सीटी सर्वे नं.१०००६ पैकी फ्लॅट नं.एफ-६** ज्याचा महानगरपालिका **मालमत्ता क्र.१-१५-१३३३/२६A (४०२०११५०३००)** श्री.**शेख अहेमद शेख बशीर/बंडेवार,** यांच्या नावे असलेली मालमत्ता यांचेकडून अर्जदाराने **विक्रीखत क्र.७४३१ दि.०३/१२/२०२०** च्या आधारे विकत घेतली आहे./वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नावे कर आकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे. तरी या संबंधात कोणास कांही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (७) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. नसता वरील अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नावाने वरील प्रमाणे मालमत्ता नोंद घेण्यात येईल.

**चतुःसिमाः- पुर्वेस**- फ्लॅट नं.०३ आहे, **पश्चिमेस**-ओपन डक्ट व नंतर फ्लॅट नं.एफ-५ आहे, **दक्षिणेस**-सामाईक जागा आहे नंतर ३० फुट रुंद रस्ता आहे, **उत्तरेस**-फ्लॅट नं.एफ-७ आहे.

स्वाक्षरित/-
**सहाय्यक आयुक्त**
क्षेत्रिय कार्यालय-२ अशोकनगर
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

## नगर परिषद कार्यालय हदगाव

जा.क्र.१७७५/२०२६
कार्यालय नगर परिषद हदगाव दि.७/९/२०२६

सर्व जनतेस ह्या जाहीर प्रगटनद्वारे कळविण्यात येते कि, हदगाव न.प.हद्दीतील शेत सर्व्हे नंबर २२१/३ मधील प्लॉट क्र.६१ वार्ड क्र.-- मालमत्ता क्र.-- मोकळी जागा श्री शिरीष गोपाळराव मनाठकर यांचे नावे असलेली मालमत्ता खरेदी खत आधारे (दस्त क्र.१२१४/२०२५) आधारे श्री शिवम संजय चुनूकवाड यांचे नावे करण्यात येत आहे.

**ज्याची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे**

पूर्वेस :- ६ मीटर अंतर्गत रस्ता, पश्चिमेस :- प्लॉट क्र.७६, दक्षिण :- प्लॉट क्र.६०, उत्तर :- प्लॉट क्र.६२

**वरील चतु:सीमेच्या आतील प्लॉटची जागा**

अर्जदार श्री.शिवम संजय चुनूकवाड यांच्या नावे करणे बाबत या कार्यालयात अर्ज दिला आहे. या बाबत कोणास आक्षेप असल्यास प्रसिध्दी दिनांका पासून (१५) दिवसाचे आत या कार्यालयास लेखी पुराव्यासह दाखल करावे. मुदतीनंतर आलेला आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही व सदर जागेची नोंद रीतसर अर्जदाराच्या नावे न.प. च्या मालमत्ता रजिस्टरला घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर परिषद हदगाव

## नगर परिषद कार्यालय हदगाव

जा.क्र.१७७५/२०२६
कार्यालय नगर परिषद हदगाव दि.७/९/२०२६

सर्व जनतेस ह्या जाहीर प्रगटनद्वारे कळविण्यात येते कि, हदगाव न.प.हद्दीतील शेत सर्व्हे नंबर -- मधील प्लॉट क्र.-- वार्ड क्र.०१ मालमत्ता क्र.३३८/१ मोकळी जागा वैशाली बाळासाहेब देशमुख यांचे नावे असलेली मालमत्ता खरेदी खत आधारे (दस्त क्र.२२६१/२०२६) आधारे श्रीमती मीन ज्ञानेश्वर सिंगनवाड यांचे नावे करण्यात येत आहे.

**ज्याची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे**

पूर्वेस :- प्लॉट क्रमांक ४ ची जागा, पश्चिमेस :- सहा मीटर रुंदीचा अंतर्गत रस्ता, दक्षिण :- प्लॉट क्र.५ चा भाग, उत्तर :- सहा मीटर रुंदीचा अंतर्गत रस्ता.

**वरील चतु:सीमेच्या आतील प्लॉटची जागा**

अर्जदार श्रीमती मीन ज्ञानेश्वर सिंगनवाड यांच्या नावे करणे बाबत या कार्यालयात अर्ज दिला आहे. या बाबत कोणास आक्षेप असल्यास प्रसिध्दी दिनांका पासून (१५) दिवसाचे आत या कार्यालयास लेखी पुराव्यासह दाखल करावे. मुदतीनंतर आलेला आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही व सदर जागेची नोंद रीतसर अर्जदाराच्या नावे न.प. च्या मालमत्ता रजिस्टरला घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर परिषद हदगाव

## नगर परिषद कार्यालय हदगाव

जा.क्र.१७७५/२०२६
कार्यालय नगर परिषद हदगाव दि.७/९/२०२६

सर्व जनतेस ह्या जाहीर प्रगटनद्वारे कळविण्यात येते कि, हदगाव न.प.हद्दीतील शेत सर्व्हे नंबर २६९/२/३ मधील प्लॉट क्र.४५ वार्ड क्र.०१ मालमत्ता क्र.३६८/२ या मालमत्ते मध्ये श्री पांडुरंग व्यंकटराव साखरे यांचे नावे असलेली मालमत्ता खरेदी खत आधारे (दस्त क्र.१५३०/२०२६) आधारे श्री दिगंबर बसाजी कोल्हे यांचे नावे करण्यात येत आहे.

**ज्याची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे**

पूर्वेस :- इंदु दिनेशराव वाघमारे यांची जागा, पश्चिमेस :- मालमत्ता क्र.३६९ ची मोकळी जागा, दक्षिण :- ६ मिटर रुंदीचा रस्ता, उत्तर :- सुदाम राउतराव यांची जागा

**वरील चतु:सीमेच्या आतील प्लॉटची जागा**

अर्जदार श्री.दिगंबर बसाजी कोल्हे यांच्या नावे करणे बाबत या कार्यालयात अर्ज दिला आहे. या बाबत कोणास आक्षेप असल्यास प्रसिध्दी दिनांका पासून (१५) दिवसाचे आत या कार्यालयास लेखी पुराव्यासह दाखल करावे. मुदतीनंतर आलेला आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही व सदर जागेची नोंद रीतसर अर्जदाराच्या नावे न.प. च्या मालमत्ता रजिस्टरला घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर परिषद हदगाव

## नगर परिषद कार्यालय हदगाव

जा.क्र.१७७५/२०२६
कार्यालय नगर परिषद हदगाव दि.७/९/२०२६

सर्व जनतेस ह्या जाहीर प्रगटनद्वारे कळविण्यात येते कि, हदगाव न.प.हद्दीतील शेत सर्व्हे नंबर १५२/८ मधील प्लॉट क्र.५ वार्ड क्र.-- मालमत्ता क्र.-- मोकळी जागा श्री शेफीवुलरहेमान वलीवुरहेमान यांचे नावे असलेली मालमत्ता खरेदी खत आधारे (दस्त क्र.४६१७/२०२५) आधारे श्री अमोलकुमार प्रकाशराव बुरके यांचे नावे करण्यात येत आहे.

**ज्याची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे**

पूर्वेस :- दामकोडवार व रावते यांची जमीन, पश्चिमेस :- ९ मीटर रुंदीचा अंतर्गत रस्ता, दक्षिण :- प्लॉट क्र.६ ची जागा, उत्तर :- प्लॉट क्र.४ ची जागा

**वरील चतु:सीमेच्या आतील प्लॉटची जागा**

अर्जदार श्री.अमोलकुमार प्रकाशराव बुरके यांच्या नावे करणे बाबत या कार्यालयात अर्ज दिला आहे. या बाबत कोणास आक्षेप असल्यास प्रसिध्दी दिनांका पासून (१५) दिवसाचे आत या कार्यालयास लेखी पुराव्यासह दाखल करावे. मुदतीनंतर आलेला आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही व सदर जागेची नोंद रीतसर अर्जदाराच्या नावे न.प. च्या मालमत्ता रजिस्टरला घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर परिषद हदगाव

## नगर परिषद कार्यालय हदगाव

जा.क्र.१७७५/२०२६
कार्यालय नगर परिषद हदगाव दि.७/९/२०२६

सर्व जनतेस ह्या जाहीर प्रगटनद्वारे कळविण्यात येते कि, हदगाव न.प.हद्दीतील शेत सर्व्हे नंबर २५१/२/३ मधील प्लॉट क्र.१० वार्ड क्र.-- मालमत्ता क्र.-- मोकळी जागा श्री पंकज देविदास सोनूने यांचे नावे असलेली मालमत्ता खरेदी खत आधारे (दस्त क्र.२३०२/२०२६) आधारे श्री सुनील देविदास सूर्यवंशी यांचे नावे करण्यात येत आहे.

**ज्याची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे**

पूर्वेस :- प्लॉट क्र.०९ ची जागा, पश्चिमेस :- ९ मीटर अंतर्गत रुंदीचा रस्ता, दक्षिण :- ९ मीटर अंतर्गत रुंदीचा रस्ता, उत्तर :- प्लॉट क्र.११ ची जागा

**वरील चतु:सीमेच्या आतील प्लॉटची जागा**

अर्जदार श्री.सुनील देविदास सूर्यवंशी यांच्या नावे करणे बाबत या कार्यालयात अर्ज दिला आहे. या बाबत कोणास आक्षेप असल्यास प्रसिध्दी दिनांका पासून (१५) दिवसाचे आत या कार्यालयास लेखी पुराव्यासह दाखल करावे. मुदतीनंतर आलेला आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही व सदर जागेची नोंद रीतसर अर्जदाराच्या नावे न.प. च्या मालमत्ता रजिस्टरला घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर परिषद हदगाव

# पाऊस गायब...पिके कोमेजली;माहूर तालुक्यावर दुष्काळाचे सावट

माहूर/प्रतिनिधी-पावसाळा सुरू होऊन तीन महिने उलटले, तरी माहूर परिसरात समाधानकारक पाऊस न झाल्याने खरीप हंगामातील पिकांवर दुष्काळाचे गंभीर सावट निर्माण झाले आहे. पावसाच्या दीर्घ खंडामुळे मूग, उडीद, सोयाबीन, कपाशी यांसह विविध पिकांची वाढ खुंटली असून, उभी पिके अक्षरशः कोमेजून चालली आहेत. तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलेली पिके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू असतानाच महावितरणच्या वारंवारच्या वीज खंडित होण्यामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.

माहूर तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीला काही प्रमाणात पावसाने हजेरी लावली. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या. मात्र, त्यानंतर पावसाने दडी मारल्याने पिकांची अवस्था चिंताजनक झाली आहे. अनेक ठिकाणी जमिनीतील ओलावा कमी झाल्याने पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत. आगामी काही दिवसांत दमदार पाऊस न झाल्यास खरीप हंगाम हातातून जाण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.काही शेतकऱ्यांच्या विहिरींमध्ये थोडेफार पाणी उपलब्ध आहे. पावसाअभावी हे पाणी पिकांना देऊन पिके वाचविण्याचा प्रयत्न शेतकरी करीत आहेत. मात्र, महावितरणकडून इमर्जन्सी लोडशेडिंगच्या नावाखाली वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. शेतीपंपासाठी उपलब्ध असलेल्या वीजपुरवठ्याच्या वेळेतही सातत्य नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. आठ तास वीज मिळणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात त्यातील चार तासदेखील अखंडित वीजपुरवठा होत नसल्याने पिकांना पाणी देणे कठीण झाले आहे. शासनाने शेतीपंपांसाठी मोफत आठ तास वीज देण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, ग्रामीण भागात वीजच उपलब्ध नसेल तर या योजनेचा उपयोग काय, असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत.पाऊस नाही, पिके सुकत आहेत. विहिरीत थोडे पाणी आहे; पण ते पिकाला देण्यासाठी वीज मिळत नाही. मग शासनाने दिलेल्या मोफत विजेचा आम्हाला काय उपयोग? असा सवाल शेतकऱ्यांकडून केला जात आहे.खरीप पिकांचे उत्पादन घटल्यास त्याचा थेट परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होण्याची शक्यता आहे. शेतमजुरांना रोजगाराच्या संधी कमी होण्याबरोबरच ग्रामीण बाजारपेठेतील व्यवहार मंदावण्याची भीती आहे. कृषी क्षेत्रावर अवलंबून असलेल्या छोट्या व्यावसायिकांनाही त्याचा फटका बसू शकतो. या पार्श्वभूमीवर शासन व प्रशासनाने तातडीने तालुक्यातील पिकांची पाहणी करून नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे, शेतकऱ्यांना आर्थिक मदत, पीकविमा दाव्यांचा जलद निपटारा, रोजगार हमीच्या कामांना गती आणि उपलब्ध जलस्रोतांचा प्रभावी वापर याबाबत ठोस उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.सध्या माहूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत. येत्या काही दिवसांत समाधानकारक पाऊस झाला तर हातातून निसटत चाललेल्या खरीप पिकांना काही प्रमाणात जीवदान मिळू शकते. मात्र, पावसाने आणखी दडी मारल्यास माहूर तालुक्यातील दुष्काळसदृश्य परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता असून, त्याचा सामना करण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच उपाययोजना करण्याची गरज आहे.

# महाराणा प्रताप चौक ते जाधव हॉस्पिटल रस्ता अतिक्रमणमुक्त करा!

## अन्यथा १५ सप्टेंबर पासून उपोषण;माजी सैनिक संघटनेचा इशारा

कंधार/प्रतिनिधी-कंधार शहरातील महाराणा प्रताप चौक ते जाधव हॉस्पिटल दरम्यान राज्य मार्ग क्रमांक २५० वर मोठ्या प्रमाणात झालेले अतिक्रमण तात्काळ हटवावे, अशी मागणी माजी सैनिक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. अतिक्रमण हटविण्यास प्रशासनाने दिरंगाई केल्यास दि. १५ सप्टेंबर रोजी कंधार नगर परिषद कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल, असा इशारा माजी सैनिक संघटनेने दिला आहे.

यासंदर्भात माजी सैनिक बालाजी रामप्रसाद चुकलवाड यांनी कंधार नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, महाराणा प्रताप चौक ते जाधव हॉस्पिटल हा रस्ता सन १९६१ पासून राज्य मार्गाच्या दर्जाचा असून त्याची अधिकृत रुंदी १०० फूट आहे. या मार्गावरील शहरातील सुमारे ४५० मीटर रस्त्याच्या कामास मंजुरी मिळून अनेक वर्षे झाली आहेत. मात्र, रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्यामुळे रस्त्याचे काम करताना सार्वजनिक बांधकाम विभागाला उपलब्ध जागेनुसार रस्ता अरुंद करावा लागत आहे. अतिक्रमणाचा प्रश्न गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असून त्याचा थेट परिणाम वाहतूक व्यवस्थेवर तसेच रस्त्याच्या विकास कामावर होत असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. नगर परिषद हद्दीतील अतिक्रमणे नगर परिषदेने तातडीने हटवावीत. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत असलेल्या अतिक्रमणांवर कारवाई करण्यासाठी नगर परिषदेची परवानगी आवश्यक असल्यास तीही विलंब न करता द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, महाराणा प्रताप चौक ते जाधव हॉस्पिटल या मार्गावरील अतिक्रमणे तात्काळ हटविण्यात आली नाहीत,तर दि.१५ सप्टेंबर रोजी कंधार नगर परिषद कार्यालयासमोर माजी सैनिक संघटनेच्या वतीने उपोषण करण्यात येईल.

# युजीसी-नेट परीक्षेच्या पार्श्वभूमीवर परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

नांदेड/प्रतिनिधी-विद्यापीठ अनुदान आयोगाची राष्ट्रीय पात्रता परीक्षा दि. ९ व १० सप्टेंबर रोजी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आयॉन डिजिटल झोन आयडीझेड, विष्णुपुरी, नांदेड या परीक्षा केंद्रावर सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत घेण्यात येणार आहे. परीक्षा सुरळीत, शांततापूर्ण आणि कोणत्याही अडथळ्याविना पार पडावी, यासाठी परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक, नांदेड डॉ.निलाभ रोहन यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १६३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून हा आदेश जारी केला आहे. त्यानुसार दि. ९ व १० सप्टेंबर रोजी सकाळी ७ ते रात्री ८ या कालावधीत परीक्षा केंद्रापासून ३०० मीटर परिसरात परीक्षेच्या कामाशी संबंधित अधिकारी व कर्मचारी वगळता इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. या कालावधीत परीक्षा केंद्राच्या ३०० मीटर परिसरातील सार्वजनिक दूरध्वनी, एसटीडी, आयएसडी, भ्रमणध्वनी, प्रतिकृती यंत्र (फॅक्स), छायाप्रत यंत्र (झेरॉक्स), संदेशयंत्र (पेजर) तसेच ध्वनिक्षेपक यांचा वापर बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## आठ गोवंशाची सुटका

नांदेड/प्रतिनिधी-अर्धापूर शहरातील काझी गल्लीमध्ये बांधुन ठेवलेल्या आठ गोवंशाची पोलीसांनी शनिवारी सुटका केली आहे. काझी गल्ली मधील एका टिनच्या शेडमध्ये कत्तलीसाठी आठ गोवंश बांधुन ठेवल्याची माहिती अर्धापूर पोलीसांना मिळाली. पोलीस निरीक्षक श्री.मांजरमकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथकाने शनिवारी कारवाई करुन आठ गोवंशाची सुटका केली. याप्रकरणी अर्धापूर पोलीस ठाण्यात दाऊत बाबुखान पठाण रा.अर्धापूर, मो. अन्सार मो. बाबू कुरेशी रा.खुदबेनगर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी तहसीलदारांना निवेदन

मुदखेड/प्रतिनिधी-धनगर समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करून आरक्षणाची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, या मागणीसाठी मुदखेड तालुका सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने आज (सोमवार) दि. ७ सप्टेंबर रोजी तहसीलदार, मुदखेड यांना निवेदन देण्यात आले.



निवेदनात म्हटले आहे की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धनगर समाजाला एसटी प्रवर्गातील आरक्षणाबाबत यापूर्वी आश्वासन दिले होते. सत्तेत आल्यानंतर पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत धनगर समाजाच्या एसटी आरक्षणासंदर्भात निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आल्याचा दावा समाज बांधवांनी निवेदनातून केला आहे. मात्र, अद्याप या मागणीची अंमलबजावणी झालेली नसल्याने शासनाने धनगर समाजाला दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मण देवदे,गोविंद बने, नगरसेवक उपेंद्र देवदे, धनगर समाज मुदखेड तालुका अध्यक्ष नितीन माने, गजानन कमळे, वामन गुंठे, बालाजी वड्डे, जळबाजी कमजळे, चिंगु संभोड, कार्तिक वडे यांच्यासह धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अनुसुचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याच्या मागणीसाठी सकल मातंग समाजाच्यावतीने दि.१३ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या पूर्वतयारी संदर्भात शासकीय विश्रामगृह येथे पदाधिकाऱ्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी आ.जितेश अंतापूरकर, माजी आ.अविनाश घाटे, सतीश कावडे, मारोती वाडेकर, गणेश तादलापूरकर व इतर उपस्थित होते.

# हदगाव शहराच्या विकासाचा मास्टर प्लॅन तयार-आ.कोहळीकर

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहराच्या सर्वांगीण व नियोजनबद्ध विकासाला गती देण्यासाठी विकासाचा व्यापक आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या आहेत. लोकनियुक्त नगराध्यक्ष प्रतिनिधी भास्करदादा वानखेडे यांनी आ.बाबूराव कदम कोहळीकर यांच्यासोबत शहरातील विविध प्रलंबित व प्रस्तावित विकासकामांबाबत सविस्तर चर्चा केली.

हदगाव शहराच्या मूलभूत सुविधांसह युवक, खेळाडू, पशुपालक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या गरजा केंद्रस्थानी ठेवून विविध महत्त्वाकांक्षी योजनांवर बैठकीत मंथन करण्यात आले शहरा नजीक तामसा रोडवरील भदंत टेकडी परिसरात विपश्यना केंद्र, शहरातील युवा खेळाडूंसाठी भव्य जिल्हास्तरीय क्रीडा संकुल, निजामकालीन तलावाचे सौंदर्यीकरण, तसेच शहराच्या मध्यवर्ती भागातील शासकीय गोदामाची जागा नगर परिषदेस हस्तांतरित करून त्याठिकाणी कार्यालय उभारण्याच्या प्रस्तावावर चर्चा



करण्यात आली. याशिवाय बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्तावित जागेवर भव्य व्यावसायिक संकुल, नगर परिषदेसाठी अत्याधुनिक प्रशासकीय इमारत, शहरातील इतर शासकीय जागा नगर परिषदेकडे हस्तांतरित करून त्या ठिकाणी नागरिकांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करणे, तसेच पशुपालकांसाठी सर्व सुविधांनी सुसज्ज पशुवैद्यकीय रुग्णालय उभारण्याच्या प्रस्तावावरही चर्चा करण्यात आली. शहराच्या विकासाशी संबंधित सर्व प्रस्तावांना शासनस्तरावर मंजुरी मिळवून देण्यासाठी प्रभावी पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही आ.बाबूराव कदम कोहळीकर यांनी दिली. हदगावकरांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देऊन विकासकामांना गती देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, हदगाव शहरासाठी मंजूर झालेल्या भूमिगत गटार योजनेलाही आता गती मिळणार आहे. या योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल लवकरच तयार करण्यात येणार असून, डीपीआर पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष कामाच्या भूमिपूजनासाठीही प्रयत्न केले जातील, अशी माहिती आ.कोहळीकर यांनी दिली.

# मांडवीत बंजारा समाजाचा पारंपरिक तीज उत्सव उत्साहात

मांडवी/प्रतिनिधी-मांडवी येथे बंजारा समाजाचा पारंपरिक व सांस्कृतिक तीज उत्सव रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी अत्यंत उत्साहपूर्ण, मंगलमय आणि भक्तिमय वातावरणात थाटात साजरा करण्यात आला. उत्सवाला समाजातील नागरिक, युवक-युवती तसेच महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यावेळी महिला व युवती पारंपरिक बंजारा वेशभूषेत आणि आकर्षक पारंपरिक दागिन्यांनी सजून सहभागी झाल्या होत्या.

पारंपरिक गीते, नृत्य, पूजा-विधी आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसर बंजारा संस्कृतीच्या रंगात न्हाऊन निघाला होता.या सोहळ्यास नाईक बाबूसिंग राठोड, कारभारी प्रदीप चव्हाण, कुंदन पवार, प्रफुल राठोड, दीपक चव्हाण, अविनाश राठोड, नवीन राठोड, मधुकर राठोड, अविनाश चव्हाण, माधव राठोड, शामराव राठोड, प्रेमसिंग सकवान, रमेश सकवान, दिनेश रूनवाल, वसंत जाधव, प्रदीप जाधव, खुरमी जाधव, दयाराम जाधव, काळूराम राठोड, धनलाल पवार, बंजारा पोशाखाचे रचनाकार सुरेश धर्मा राठोड, प्रशांत राठोड, सुधाकर राठोड यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. उत्सवामध्ये महिलांचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. सरला सुरेश राठोड, चंद्रकलाबाई चव्हाण, संध्या प्रफुल राठोड, जयश्री नवीन राठोड, यमुनाबाई जाधव, जेउबाई राठोड, शिलाबाई राठोड, बेबी पवार, कल्पना अविनाश राठोड, सविता कुंदनसिंग पवार, शालिनी शंकर राठोड, सुनीता मंगेश राठोड, वनिता प्रदीप चव्हाण, सरिता दीपक चव्हाण, मंजू अविनाश चव्हाण यांच्यासह परिसरातील असंख्य महिला सहभागी झाल्या. बंजारा समाजाच्या सांस्कृतिक परंपरेमध्ये तीज उत्सवाला विशेष महत्त्व आहे. या उत्सवाच्या माध्यमातून नव्या पिढीला समाजाची संस्कृती, रूढी-परंपरा आणि लोककलेची ओळख करून देण्यासोबतच सामाजिक एकोपा आणि बंधुभाव वाढीस लागतो. मांडवी येथे झालेल्या या उत्सवातूनही समाजाची सांस्कृतिक एकजूट अधोरेखित झाली. उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी समाजातील नागरिकांनी एकत्रितपणे पुढाकार घेतला.

# विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी शिवराज पाटील

नायगाव/प्रतिनिधी-नरसी येथील बालाजीनगर परिसरातील विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी शिवराज पाटील बामणीकर, तर उपाध्यक्षपदी बालाजी पेंटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नुकत्याच झालेल्या बैठकीत मंडळाच्या नवीन कार्यकारिणीची सर्वानुमते निवड झाली.

सचिवपदी योगेश चौधरी, कोषाध्यक्षपदी योगेश पाटील गंभीरे यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून श्याम पाटील चोंडे, गणेश पाटील टोम्पे, उत्तम पाटील बोधने, बालाजी पाटील सोरटे, अंबादास कोकणे, चंद्रकांत ईबीतदार आणि मदन पाटील यांची निवड झाली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. गणेशोत्सवाच्या काळात धार्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबवून उत्सव उत्साहात आणि शांततेत साजरा करण्याचा निर्धार मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. यावेळी बालाजीनगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

## शिंदे-फडणवीस आम्हाला...

आरोपही जरांगे यांनी केला. या आरोपांमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, १२ सप्टेंबरला नगर, नाशिकसह महाराष्ट्रातील सर्व मराठ्यांनी अंतरवाली सराटीत यायचे आहे. हातातील कामे बाजूला ठेवून बैठकीला उपस्थित राहा. कोणीही घरी बसून ही बैठक चुकवू नका. याच बैठकीत मुंबईचा निर्णय होणार आहे, असे आवाहन जरांगे यांनी केले.

## गणेशोत्सव काळात...

शिवजयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, रामनवमी, दहीहंडी आदी उत्सवांच्या काळात डॉल्बी सिस्टिमच्या वापराबाबत पूर्वीही संबंधितांना नोटिसा देऊन तसेच बैठका घेऊन समज देण्यात आली होती. मात्र, काही ठिकाणी नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर डॉल्बी वाजविण्यावरून तणावाची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३(१) तसेच लागू असलेल्या इतर कायदेशीर तरतुदींनुसार कारवाई करण्यात येईल, असे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे गणेशोत्सव व आगामी विविध उत्सव शांततेत, सुरक्षिततेत आणि ध्वनिप्रदूषणमुक्त वातावरणात साजरे करण्यासाठी नागरिक, गणेश मंडळे, डॉल्बी सिस्टिम चालक व मालक यांनी प्रशासनाच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्हात कोरडा दुष्काळ...

वेळेवर पडत नसल्याने सोयाबीन कापसासह ईतर पिके वाळत आहेत त्यामुळे सरकारने नांदेड जिल्हात कोरडा दुष्काळ जाहीर करावा तसेच योग्य त्या उपायोजनेसह हेक्टरी एक लक्ष रूपये आर्थिक मदत करावी अन्यथा संभाजी ब्रिगेडच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असे निवेदन देण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, सुभाष कोल्हे, कमलेश कदम, परमेश्वर पाटील, प्रदीप गुब्रे,किरण वानखेडे, कुंडलिक शिंदे, रमेश बोकारे,नितीन कोकाटे, दिलीप दळवी, प्रदीप इंगोले, बालाजी पाटील व इतर उपस्थित होते.

# देगलूर महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात

देगलूर/प्रतिनिधी-येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयात शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजनकरुण कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमास अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य देवेंद्र मोतेवार, विजय उनग्रतवार यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ.एम. एम. चमकुडे उपप्राचार्य डॉ.व्ही. जी. शेरीकर, पर्यवेक्षक प्रा.संग्राम पाटील उपस्थित होते. यावेळी अ व्या शिक्षण संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य देवेंद्र मोतेवार यांनी आपल्या मनोगतात शिक्षक हा राष्ट्राचा निर्माता आहे, गुरु-शिष्य परंपरा ही आपल्या भारतीय संस्कृतीची ओळख आहे असे सांगितले. शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा या दिवसाचा खरा उद्देश आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमात विश्वस्ताच्या हस्ते शिक्षकांना पेन व गुलाब पुष्प देवून गौरव करण्यात आला.

# लक्ष्मण गणगोपले यांचे दुःखद निधन

नायगाव/प्रतिनिधी-बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी येथील रहिवासी लक्ष्मण गंगाधर गणगोपले (वय ४५) यांचे रविवार,



दि. ६ सप्टेंबर रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवार, दि.७ सप्टेंबर रोजी दुपारी कुंडलवाडी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई-वडील, दोन मुले, सून असा परिवार आहे. ते ओड समाजाचे सचिव नंदकिशोर नरसीकर यांचे मेहुणे होत. स्व. लक्ष्मण गणगोपले हे मनमिळाऊ, प्रेमळ व आपुलकीच्या स्वभावाचे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते.

# जुगार अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-उमरी तालुक्यातील मौ.चिंचाळा शिवारात सुरु असलेल्या जुगार अड्डयावर रविवारी दुपारी पोलीसांनी धाड टाकुन पाच जणांना अटक केली.

चिंचाळा येथे जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. उमरी पोलीसांनी रविवारी धाड टाकुन प्रकाश गंगाधर शिंदे यांच्यासह पाच जणांना रंगेहाथ पकडले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४